I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023 : 545-549
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्त्री : विषयक धोरण

नथ्थु सिताराम गिरडे
कला व वाणिज्य महा. भिसी ता. चिमूर जि. चंद्रपूर
*Corresponding Author :- girdenss@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :—**
छत्रपती शिवाजी महाराजांवर माँ साहेब जिजाऊच्या शिकवणीमुळे राजांचे व्यक्तिमत्व विविध अंगाने आकार घेत गेले. बालवयात झालेले संस्कार दुरगामी परिणाम करणारी ठरत असतात. माँ साहेब जिजाऊच्या भूमिकेशिवाय प्रसागानुरूप पित्याची भूमिका पार पाडत भूमिकेचे बाल शिवरायांनी चांगलेच अवलोकन केले.
परंतु शिवरायांच्या हदय पटलावर मातेची छाप प्रभावी ठरल्यास आश्चर्य नव्हे.
बालशिवबाने आईची दयाबुध्दी, उदार अंत:करण, न्यायप्रियता, जबाबदार वृत्ती आणि प्रसंगी कठोरपणा इत्यादी चांगल्या गोष्टी स्वत:मध्ये आत्मसात केल्या. परस्त्री मातेसमान लेखणारे, शत्रुपक्षाकडील स्त्रियांचाही सन्मान करणारे, प्रगतशील विचार बाळगून त्यावर अमल करणारे मध्ययुगीन काळात केवळ छत्रपती शिवाजी महाराज असू शकतात.
ज्या काळात बादशाही सरदार पळवून नेणे, अब्रु लुटणे, जनानखान्यात जबरदस्तीने स्त्रियांना ठेवणे. अशा मुस्लीम राजवटीत मराठी सैनिक शिवरायांचा आदेश शिरसावन्य मानून स्त्रियांच्या इज्जतीचे रक्षण करीत होते.
स्त्रियासंबधीच्या गुन्हयाला मुळीच मुलाहिजा नव्हता. मग तो कितीही मोठा सरदार असो. फॉरीन बायोग्र युरोपियन लेखक म्हणतो की, शिवाजीच्या सैन्यातील सर्व शिपायांनी कोणीही स्त्रीस उपद्रव देता कामा नये अशी ताकद दिली होती. हा हुकूम मोडणाऱ्या इतकी कडक शिक्षा दिली जात होती की अशा प्रकारचे कृत्य करण्यास कुणीही धजावत नसत.
शिवरायांच्या मृत्युची बातमी ऐकल्यावर स्वत: बादशहा औरंगजेब उद्‌गारला होता की, आपल्या हाता पडलेल्या शस्त्रूच्या स्त्रियांच्या अब्रुची कदर करणरा एक सच्चा वीर मरण पावला. यावरून शिवरायांची स्त्रिविषयक दृष्टीकोन दिसून येतो.

**प्रस्तावना :**

१७ वे शतक मराठ सत्तेचा व शिवाजीचा उदय ही या शतकातील फार मोठी घटना मानली पाहिजे. शिवाजी महाराजांचा जन्म झाला नसता तर भारत स्वत्वाला पूर्ण पोरखा झाला असता. संपूर्ण भारत इस्लाममय झाला असता. स्वराज्य काय आहे याची त्यांना कल्पनाही आली नसती. लोकांमध्ये स्वराज्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य वयाच्या पंधराव्या वर्शापासून सुरू केले. वयाच्या सोळाव्या वर्शी रायरेश्वराच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले तेव्हा हे राज्य व्हावे हे 'श्री' ची इच्छा अशी भावना जनतेत निर्माण करून स्वराज्य स्थापनेला आर्थिक अधिष्टान प्राप्त करून दिले.[१]

हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्यावेळी इस्लामी राजवट सर्वत्र होती. हिंदवी स्वराज्य स्थापन केल्यानंतर आपली सारी राज्य यंत्रना रयतेच्या विकासासाठी लावली. प्रजेला आपल्या अधिकाऱ्यापासून त्रास होवू नये याची त्यांनी सक्त ताकिद दिली होती. लहानपणा पासूनच राष्ट्रमाता जिजाऊने स्वराज्याचे बाळकडू पाजले होते. त्यामुळे बालपणापासून त्याच्या मनात अन्यायाची चिड निर्माण झाली होती. मुस्लीम राजवटीत मुस्लीम, जमिनदार, जहागीरदार, पाटील, गोरगरीब जनतेवर व स्त्रियांवर अत्याचार करीत. स्त्रि विव्हळण्याच्या किकांळया जिजाऊच्या कानी पडत होत्या. स्त्रियावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आणि न्याय मिळवून देण्यासाठी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून रयतेचे राज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजीच्या स्वराज्यात स्त्री विषयक धोरण हे न्याय मिळवून देणारे होते.[२]

शिवाजी महारांजानी स्त्रीला देवघरातील देवता मानत होते. परस्त्रीला माता माणनाऱ्या शिवाजी मुलखात पाटला सारख्या जबाबदार व्यक्तीने

रावणासारखा गुन्हा केला त्यामुळे राजे संतापले. स्वराज्य जन्मण्याआधी असे हलकट अधिकारी असेल तर स्वराज्य निर्माण झाल्यावर काय काय करतील. स्त्री ही मराठयाच्या देवाऱ्यातील देवता आहे. मग ती कोणत्याही जाती धर्माची असो. पथांची असो आमच्या मुजऱ्याचा मान हा स्त्री जातीला आहे. तिचा अपमान होत असेल तर रामायण वाचायचे कशाला, रामराज्य हवे कशाला. एका स्त्रिच्या प्रतिष्टेसाठी रावणाची सोन्याची लंका नष्ट झाली. राष्ट्रकुलांचा संहार झाला. चौदा चवडयाची दौलत गारद झाली. द्रौपदीची भर सभेत दुर्याधन, दुशासनाने साडी सोडली म्हणूनच महाभारत घडून आले. स्त्रीयांची प्रतिष्टा सिहांसनावर उचावण्यासाठी शिवबा राजे कर्तव्याच्या स्थानावर आरूढझाले.

छत्रपती तरूणास सांगुनी लोपले
विसरू नका कधी माय भूमी
जन्म वर्ण आपुले
इतिहास हा जगमान्य झाला.[३]

**१) राझांचा गुजर पाटील :**

राझांचा गुजर पाटील (बाबाजी– बिन भिकाजी गुजर पाटील) यांनी येथील एका गरीब शेतकऱ्यांची मुलगी शेवंता पहायला अतिशय सुंदर असल्याने संपूर्ण गावकऱ्यांच्या समोर तिच्यावर कळजबरी करून जबरदस्तीने बलत्कार केला. ऐवढेच नव्हे तर बदअमल केला. शेवंताचा वडीलांने छत्रपती शिवरायाकडे फिर्याद केली. तेव्हा शिवाजी महाराजांनी आपले सैन्य पाटवून त्याला कैद करून शिवाजी महाराजासमोर हजर केले. तेव्हा ते अठरा वर्षाचे होते. या प्रकरणात राझ्यांच्या पाटलाला शिवाजी शिक्षा ठोठावू शकत नाही असे अदिलशहाचा सरदार मियारहिमने सांगितले. परंतु शिवाजीने माझ्या वतनदारीत चोख बंदोबस्त करण्याचा अधिकार माझा आहे असे मियारहिमला ठणकावून सांगितले. गुन्हाचा तपास करून गुन्हा सिध्द झाल्यावर शिवाजी महाराजांनी अशी शिक्षा ठोठावली कि मावळ प्रदेशात चौकात त्याचे हात–पाय कलम करून त्याचा हाता पायाचा चौंरग केला. तेव्हा मॉसाहेब जिजाऊ म्हणाल्यात अरे षिवबा त्याचा चौंरग करण्यापेक्षा त्याला ठार का केला नाही. तेव्हा शिवबा म्हणाले यानंतर कोणीही अशाप्रकारचा गुन्हा करू नये. अर्थात स्त्रियांकडे कोणीही वाकडया नजरेने पाहू नये. स्त्रियांवर झालेला अन्याय शिवाजीने कधीही खपवून घेतला नाही.

**२) मुल्ला अहमदची सून :**

कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद कल्याण मध्ये निश्चित बसला होता. आपला संपूर्ण खजिना घेवून तो विजापूरकडे निघाला. सोबत त्याचा मुलगा मुल्ला अहिया आपल्या पत्नीसह जात होता. दिवस उजेडी घाटातून प्रवास करीत होता. मेण्यातून जाणारी तरूण सून मेण्याचे पडदे बाजूला करून घाटाचे निसर्ग सौदर्य पाहत होती. घाटाची चढण लागली असता घोडदळ थकले. मुल्ला अहमदचे सैनिक घामाघूम झाले. अशातच शिवाजीच्या सैनिकांनी मुल्ला अहमदचा सैनिकावर हल्ला केला. कल्याण खजिना सुरक्षित हाती आला. शिवाजीचे सैन्य कल्याण दरवाजाजवळ जाताच गोधंळ निर्माण झाला. कल्याण शहरावर मराठयांनी ताबा मिळविला. क्षणातच सुभेदार मुल्ला अहमद गिरफ्तार केल्या गेला. भगवा ध्वज डौलाने फडकू लागला आबाजी महादेवने शाही शामियान तयार करून छत्रपती शिवरायांची वाट बघत होते. आबाजी महादेवने कल्याण खजिना छत्रपती शिवाजी समोर आणला. सुवर्ण, रौप्य, नाणी, रत्नांचे ढिग राजा समोर आणले. षेवटी कल्याणचा सुभेदार व त्याचा मुलगाही हजर करण्यात आला. राजांनी त्यांना मोकळे करण्याचा हुकुम दिला. ते आश्चर्य चकित झाले. अजून एक कैदी शिल्लक आहे. छत्रपती शिवाजीने विचारले कोण आहे. तेव्हा कल्याणच्या सुभेदाराची सून उभी करताच शिवाजी संतापले. शिवाजी म्हणाले मनात आणले असते तर तिल्हा तुम्हीही मोकळे करू शकले असते. शिवाजीनी आदेश देताच मुसलमानी वेश परिधारण केलेली ती युवती राजा समोर उभी केली. तिच्या चेहऱ्यावर झिरझिरीत ओढणीचे अवगंठण होते.

मेहंदीच्या लाल रगांने हाताचे नाजूक पंजे कंप पावत होते. सुकूमार थोर पावलांचे अंगठे रूजामाच्या गालीचात रूजत होते. तेव्हा षिवाजी संतापले आणि शांत झाल्यावर ते आबाजी महादेवांना म्हणाले कि ही मुलगी सौदर्याची खान आहे. आबाजी महादेव म्हणाले तिल्हा नाटय शाळेत स्थान दिले तर हिचा सन्मान होईल. परंतू शिवाजी म्हणाले हाताचे समर्थन पापाने होत नाही. लोक रिवाजापेक्षा आम्ही माणूसकीला ओळखतो. तेव्हा त्यांना त्यांच्या मॉसाहेब जिजाऊची आठवण झाली. तेव्हा शिवाजी राजांनी तिचा मान सन्मान करून बांगडया, साळी-चोळी देऊन त्याच्या पत्नीसह तिला परत केले. तेव्हा सुभेदारच्या सुनेच्या डोळयात पाणी आले तिने शिवाजी राजांना सन्मानाने कुर्नीसात केला.

कल्याणच्या सुभेदाराच्या सुनविशयी भिमशाहिर वामणदादा कंर्डक म्हणतात

‘‘काळया रात्री तडपत होतं तिच्या रूपात उन्ह
अशी देखणी होती एका मुसलमानाची सुन।।
त्या मुलीला आई म्हणावा राजा तो शिलवान
असाच आमचा राजा होता माणुसकीची खाण’’।।

**३) सावित्रीबाई देसाई :**

छत्रपती शिवाजी महाराज दक्षिण विजय करून परतत असतांना, कर्नाटकात बेलवाडी या गावात एक देसाई गढी होती. इ.स. १६७८ ला दक्षिण स्वारीवरून परतत असतांना तेथील देसाई पाटलांनी मराठयांचे २०० बैल पळविले छत्रपती शिवाजी म्हणाले त्याला समजवून सांगा आणि समजत नसेल तर दमदाटी देऊन आपले बैल परत आणा. परंतू देसाई पाटील ऐकत नव्हता. सखुजी गायकवाडने युध्द करून देसाई पाटील मारला गेला.

दुसऱ्या दिवशी पांढऱ्या साडीत असणारी स्त्री दोन्ही हातात तलवारी घेऊन उभी होती. देसाई पाटलाची पत्नी सावित्रीबाई तिने २७ दिवस निकराईची झुंज दिली. २७ व्या दिवशी सखुजी गायकवाडने तिचा पराभव केला. शिवाजी समोर भव्य दरबार भरला होता. पांढऱ्या वस्त्रात असलेली सावित्रीबाई साखळदंडात जखडलेली समोर आणली. छत्रपती शिवरायांनी सांगितले ताईसाहेबांचे हात साखळदंडातून मोकळे करा. तिने २७ दिवस झुंज दिल्याने उन्माद झालेल्या सखुजी गायकवाडने तिच्यावर बदअमल केल्याने सावित्री भंयकर चिडली होती. तिने छत्रपतीना प्रश्न विचारला. तूच कारे या नराचा राजा आहे. हाच कारे न्याय, छत्रपती कळेनासे झाले. त्यानंतर त्या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. सखुजी गायकवाड दोषी ठरवण्यात आले. सखुजी गायकवाडने गून्हा मान्य करून महाराजांच्या पायाशी लोळण घालू लागला. एकवेळ माफ करा. छत्रपती शिवाजींनी आदेश दिला. त्याचे दोन्ही हात आणि दोन्ही पाय कापून उकडत्या तेलात बुडविले. सखुजीराव गायकवाड हे छत्रपती शिवाजी महाराजांची पत्नी सकवारबाईचे बंधू म्हणजेच महाराजांचे मेव्हणे पण त्यांनी सोडले नाही राजा न्यायासमोर असतांना नात्या-गोत्याची, जवळ-दुरच्याची पर्वा करीत नव्हते.

छत्रपती शिवाजी महाराज गढीतील सिहासनावर विराजमान झाले. तिला वाटले शिवाजी मला ठार मारणार माझा बाळ अनाथ होणार. छत्रपती शिवाजी समोर रडायला लागली. त्यामुळे शिवाजी राजे गहिवरले. तिचे बाळ हातात घेतले तेव्हा ती राजाच्या पायावर झुकली. माझ्या लेकराला मारू नका तेव्हा राजाने याबाळाच्या दुध-भातासाठी जिकंलेली गढी तिला परत केली. आपली बहिन माणून आजुबाजुच्या प्रदेश चोळी-बांगडीसाठी दिला. तिच्या डोळयात दुःखाने येणारे अश्रु आनंदाने वाहू लागले.[४]

**४) शाहिस्तेखानंची बुर्जी :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ एप्रिल १६६३ रोजी पुण्याच्या लाल महलात शाहिस्तेखानवर हल्ला करून त्याची बोटे छाटली. शाहिस्तेखानच्या छावणीत एकदम गडबड उडाली. सर्वत्र हल्लाकोळ झाला. मराठे शनातच पुणे सोडून निघुन गेले. छापा टाकल्यानंतर शाहिस्तेखानच्या बहिनीची मुलगी दिसत नव्हती. त्यामुळे शाहिस्तेखानची बहिन म्हणाली भाईजान-भाईजान हुजूर मेरी बेगम नही है (माझी

मुलगी) सापडत नाही. तेव्हा शाहिस्तेखान म्हणाला रडते कशाला? तुझ्या मुलीला शिवाजी आणि शिवाजीची माणंस हात लावणार नाही. चुकून त्यांच्या सोबत गेली असेल तर आईच्या मायेने पाठवतील असे शाहिस्तेखनाने आपल्या बुर्जीत लिहले आहे. महाराजांच्या शत्रुला सुध्दा महाराजांवर विश्वास होता.

**५) येशूबाईला कुलमुकत्यार पद :**

हिंदवी स्वराज्यात छत्रपतीच्या नंतर कुलमुकत्यार पद अंत्यत महत्वाचे होते. छत्रपतीच्या अनुपस्थितीत कुलमुकत्यार राज्यातील न्याय निवाडे करीत असत. मॉसाहेब जिजाऊच्या मृत्युनंतर कुलमुकत्यार पद युवराज छत्रपती संभाजीची युवारज्ञी येशूबाईला देऊन प्रषासनात महत्वाचे स्थान दिले. भारतात आजच्या परिस्थित ते पद राष्ट्रपती पदासारखे आहे. स्त्री कर्तृत्वान, बुध्दीवान असेल तर तिला प्रशासनात घेतल्या जात होते.

**६) हिरकणी बुरूज :**

रायगड म्हणजे स्वराज्याची राजधानी बेलाग आणि बुलंद किल्ला असा किला की शत्रुला किल्ल्याच्या वाटा समाजायच्या नाही. परंतू ज्यांना ये–जा करण्याचा सराव होता तेच जायचे. गडाच्या पायथ्याशी राहणारे लोक अन्यधान्य भाज्या, फळे, कपडे, दही, दुध आणून विकत असत. अट एवढीच होती कि, सुर्य मावळण्यापूर्वी गडावरून खाली उतरावे. सुर्यास्त नंतर गडाचे दरवाजे बंद होत असत. हिरकणी ही गवळण होती. तिच्याकडे दोन गाई होत्या. गाईचे दुध काढून भल्या पहाटे चरवीत दुध घेऊन रायगडावर आणून दुध विकण्याचा तिचा रोजचा नियम होता. ति दरवाज्या जवळ धावत आली. परंतू गडाचे दरवाचे बंद झाले होते. शिवाजीचा नियम असा होता की सूर्यास्तानंतर किल्याचे दरवाजे बंद केले जात होते. हिरकनीने किल्याच्या द्वारपालाला माझा छोटासा बाळ तापाने फणफणत आहे. मला माझ्या बाळासाठी घरी जाऊ द्या. परंतू द्वारपाल नियम मोडू शकत नव्हता. गडाची तटबंदी फिरून एखादी बाहेर निघण्याची जागा शोधु लागली. तेवढयात तिच एका कोपऱ्यावार लक्ष गेल तिथ तट नव्हता. तिथून तिच गाव दिसत होत. हाताची दुधाची कावड तिथेच ठेऊन ती कडा उतरू लागली. उशिरापर्यंत आपल्या घरी गेली आणि बाळाला दुध पाजले.[५]

दुसऱ्या दिवशी दुध घेऊन हिरकणी गडावर गेली असता पाहरेकरी आश्चर्यचकीत झाले. तिची चौकषी केल्यावर रात्रीची सत्य हकीकत सांगितली. तिने नियम मोडल्यामुळे तिला द्वारपालांनी छत्रपती शिवाजी समोर हजर केले. शिवाजी महाराजांनी शिपायाची फिर्याद ऐकली आणि नंतर हिरकणीची कैफियत ऐकुण घेतली. हिरकणी एवढ धाडस करून तू कडा उतरलीस. राजाच्या नियमापेक्षा आईची माया मोठी हेच खर. अशा शुरविर आईला मी नम्रपणे प्रणाम करतो. तुमच्या ममतेची धाडसाची सांक्ष कायम राहावी म्हणून तुम्ही जो कडा उतरला तेथे आम्ही बुरूज बांधणार आहे. हिरकणीला राणी दरबारात पाठवून खणा नारळाची चोळी देऊन तिचा सन्मान केला. ज्या कडयावरून ती उतरली तिची आठवण राहावी म्हणून त्या कडयाना हिरकणी बुरूज असे नाव दिले.[६]

**७) केदारची शहापूरकर व नर्मदा प्रकरण :**

स्वराज्याचे सुरनविस अण्णाजा दात्तो (पंत) यांचे जावई केदारजी शहापूरकर होय. अण्णाजी दत्तोजींची मुलगी नर्मदाचा विवाह केदारजी शहापूरकर सोबत झाला होता. परंतू तो मोघलांचा फितुर होता. नर्मदेचे स्वराज्यावर प्रेम असल्याने पतीची तक्रार छत्रपती संभाजी व युवराज्ञी येशूबाईकडे केली होती. केदारजी शहापूरकरने माझी पत्नी नर्मदा हिच्यावर संभाजी राजाची नजर असल्याचा खोटा आरोप केला. हया प्रकरणाचा निपटारा शिवाजीने न लावता हा निर्णय राणी सोयराबाईस करण्यास सांगितले. पुत्र प्रेमाच्या आंधळेपणापाई निर्णय चुकता कामा नये म्हणून हा निर्णय सोयराबाईकडे दिला. नर्मदेच्या साक्ष पुराव्या वरून केदारजी शहापूरकर दोषी ठरला. त्याला टकमक टोकाची शिक्षा दिली. नर्मदेच्या प्रामाणिक सांक्ष

पुराव्याबद्दल छत्रपती शिवाजीने तिच्या उपजिविकेसाठी एका गावाचे उत्पन्न दिले.

**सारांश**

गोठयातील गाय, घरातील आई आणि अंगणातील तुळशीला छत्रपती शिवाजी महाराजांनी अभय मिळवून दिले. स्त्रीकडे कोणीही वाकडया नजरेने पाहु नये असा त्यांचा दृष्टीकोण होता. परस्त्रिला माता माणणारा आमचा महाराष्ट्र, स्त्रिचे मांगल्य राखणारा आमचा महाराष्ट्र, स्त्रिच पावित्र्य राखणारा आमचा शिवबा राजा होता. आता काय झाल आपल्या महाराष्ट्र (देशाला) क्षणाक्षणाला स्त्रिच्या स्वातंत्र्यावर वार केले जातात. क्षणक्षणाला तिचा अपमान होतो. तिच्या चारित्र्यावर कलंक लावले जातात. रस्त्यांनी चालतांना सुध्दा ती सुरक्षीत नसते. ती घराबाहेर पडतांना असंख्य प्रश्न तिच्या आई वडीलांना पडतात. मुलगी घरी येई पर्यंत आई वडीलांचा जिवात जिव नसतो. दामिनी-निर्भया सारख्या क्रुर घटना समोर येतात. मुलीला न्याय मिळावा म्हणून आई-वडील वर्षानवर्ष कोर्टाच्या चकरा मारतात नंतर गुन्हेगारांना १५ वर्षांनी न्याय मिळतो. छत्रपती शिवाजीच्या स्वराज्यात ताबडतोब न्याय दिला जात होता. आज मात्र शिवाजीच्या कायदयांची विचारांची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासनव्यवस्थेतून आजच्या सरकारने विचार करून तशा प्रकारच्या कायदयाची अमलबजावणी केल्यास नराधमावर जरब बसेल.

**संदर्भ :**


बेन्द्रे, वा. सी- श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र, पूर्वार्थ उत्तरार्थ मुंबई-१९६२

पवार जयसिंगराव- मराठेशाहीच्या मागोवा मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर, नोव्हेंबर १९९३

पगडी सेतूमाधवराव- इतिहासाचा मागोवा, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, मे १९६५

डॉ. रोडे, सोमनाथ- मराठयांचा इतिहास, पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, नागपूर

कुलकर्णी अ. रा- शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, द्वितीयावृत्ती १६ एप्रिल १९९७

श्रीवास्तव आशीर्वादीलाल- मुगलकालीन भारत, शिवालाल अग्रवाल एण्ड कंपनी, १९६५

पानसरे गोविंद- शिवाजी कोण होता? लोकवाङ्मय प्रकाशन आवृत्ती ३ री १९८८.

सर्वधर्म समभावी- ‘छत्रपती शिवराय’ ऑल इंडिया सेक्युलर फोरम, मुंबई, प्रथम आवृत्ती, १ मे २०१०